५०७

जा. क्र. जिपजा/शिक्षण/प्रा-६/ /
कार्यालय जिल्हा परिषद, जालना.
दिनांक २/२/२००८

प्रति,
सचिव/मुख्याध्यापक,
पार्थी प्राथमिक शाळा, अंकुशनगर,
ता. अंबड.

पार्थी प्रा. शाळा अं.
आवक क्रमांक: ४०
प. क्रमांक: ०४
दिनांक: ५/२/०८

विषय :- शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय पी. आर. ई/१०९८/१९४५/प्राशि-१ मंत्रालय, मुंबई दि. १०/०३/२०००.
२) शासन निर्णय क्रमांक पीआरई क्र./१०९८ (१९४५) प्रा.शि.-१/ दिनांक १२ जुलै २००१.
३) शासन निर्णय क्रं. / पी.आर.ई/१०९८/१९४५/प्राशि-१ मंत्रालय मुंबई दि. २७/०३/२००२.
४) आपला प्रस्ताव दिनांक / /२०० १२६/०७ दि. १७/११/२००७.

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावास अनुसरून शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे संस्थेने मान्य पदाच्या आधिन राहून नेमलेल्या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस संदर्भ क्र. १, २, ३ च्या शासन आदेशाच्या अटी व शर्तीनुसार शिक्षण सेवक योजना अंतर्गत शिक्षक सेवक म्हणून नियुक्ती पत्रातील अटी व शर्तीनुसार तसेच खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) आपल्या शाळेतील वर्ग/तुकड्या अनुदान प्राप्त असून त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यास संस्थेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचारी यांच्या वेतनाची जबाबदारी शाळा/संस्थावर राहील.

२) कर्मचारी अनुसूची मंजुरी आदेशात विहीत केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात यावे.

३) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्रं. ८ अन्वये आवश्यक ते मागासवर्गीय प्रमाण राखलेले असून, मागासवर्गीय कर्मचारी यांच्या नेमणुका करण्याबाबतची कार्यवाही नियम क्रमांक ८ व ९ अन्वये पूर्ण करण्यात यावी.

४) या कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षण आपणाकडे समावुन घेण्यासाठी पाठविल्यास त्यानुसार ते अतिरिक्त म्हणुन नेमले गेल्यास नेमणुक दिलेल्या शिक्षकाला/शिक्षण सेवकाला २४ तासाची नोटीस देऊन कमी करण्यात येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी व त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

५) ~~सन २००७-०८ या वर्षात जादा वर्ग / तुकड्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने अतिरिक्त तरतुद उपलब्ध करून दिल्यास वेतन अदा केले जाईल. सदरील जादा तुकड्या अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची देयके सादर करावीत.~~

~~शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिलेल्या एस.एस.सी. /एच.एस.सी./डी.एड. उमेदवारास दरमहा रु ३०००/- चे मानधन दिले जाईल. शिक्षण सेवकाच्या मानधनाची परिगणना मासीक पध्दतीने केली जाईल.~~

५/२/०८